# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

## अंक - १७

**दिनांक- २८/०४/२०२५ ते दिनांक- ०३/०५/२०२५**

**राजपत्रातील ०६ भाग -**

| | |
|---|---|
| भाग - ०१ | बदली / नेमणुक / पदोन्नती |
| भाग - ०२ | रजा / बिनपगारी रजा |
| भाग - ०३ | वेतन / भत्ते / रोखिकरण |
| भाग - ०४ | बक्षिस / मानधन |
| भाग - ०५ | शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती |
| भाग - ०६ | प्रशिक्षण व इतर |

**प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या)**
**पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ**

**प्रति,**

**प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ -**

सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे **www.yavatmalpolice.gov.in** या अधिकृत संकेत स्थळावर **GAZETTE** या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक शाखा / पो.स्टे./ उपविपोअ.यांचे **E- Mail** वरती पाठवावे.

प्रत,

नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा, पो.अधि.कार्या. यवतमाळ.

# भाग - ०१

# बदली / नेमणुक / पदोन्नती

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल.आय.सी.चौक ता.व जि.यवतमाळ पिन कोड 445001
Email -sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष-९ /आं.जिल्हा बदली-/हजर/नेमणूक/८६२१ /२०२५ यवतमाळ, दिनांक :- 30 APR 2025

**कार्यालयीन आदेश**

**संदर्भ** :- १) या कार्यालयाचे पत्र क्र.पोअय/कक्ष९/आंजिब/स्विकृत्ती/२४३२/२० दिनांक २२/०२/२०२५व जा.क्र.२०२५ दिनांक २८.२.२०२५
२)पोलीस अधिक्षक नंदूरबार यांचेकडील पत्र क्रं क्रं.१०१/आस्था/पो.अंमलदार/आंजिब कार्यमुकत/३०५७/२०२५ दिनांक १६.४.२०२५

**विषय** :- आंतर जिल्हा बदलीवर रुजू करुन घेणेबाबत...

******

या कार्यालयाचे संदर्भीय पत्राव्दारे, खालील नमूद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोरील घटकातून यवतमाळ जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई या पदावर आंतर जिल्हा बदलीवर विनंतीवरुन घेण्यास स्विकृत्ती देण्यांत आलेली होती. त्याअनुषंगाने संबधीत पोलीस अधिक्षक यांनी उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये नमूद आदेशान्वये खालील पोलीस शिपाई यांना आंतर जिल्हा बदलीवर हजर होणेकामी कार्यमुक्त केले आहे.

त्याअनुषंगाने यवतमाळ जिल्हा पोलीस दलामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास बदलीवर हजर झाल्याने त्यांना या घटकात हजर करुन घेवून त्यांना खालीलप्रमाणे नमूद रकाना क्र. ९ मध्ये असलेल्या ठिकाणी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.अंमलदाराचे नाव/पद व ब.क्र. | घटकाचे नाव | स्विकृत्तीचे पद | भरती प्रवर्ग | स्विकृत्ती प्रवर्ग | कार्यमुक्त दिनांक व या घटकात रुजू झाल्याचा दिनांक व वेळ | या आस्थापने वरील देण्यात आलेला ब.नंबर | यवतमाळ जिल्हयात नेमणूक ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/५९८ गजानन नामदेव रामटेके | पोलीस अधिक्षक नंदूरबार | पोलीस शिपाई | अ.जाती | अ.जाती | २३/४/२०२५ म.न २५/४/२०२५ म.पु | ८१३ | **पोलीस मुख्यालय** |
| २ | पोशि/५२६ कल्पेश नामदेव रामटेके | पोलीस अधिक्षक नंदूरबार | पोलीस शिपाई | अ.जाती | अ.जाती | २३/४/२०२५ म.न २५/४/२०२५ म.पु | ८३८ | **पो.स्टे लोहारा** |

सदर पोलीस अंमलदार यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५-ब, दिनांक २६/१०/२०१७ अन्वये, महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस अंमलदाराच्या घटक आस्थापना बदली नियमावली मधील नियम क्र.५ नुसार निश्चित करण्यांत येईल. तसेच उपरोक्त पोलीस अंमलदार यांची आंतर जिल्हा बदली ही विनंती वरुन असल्याने त्यांना प्रवास भत्ता देय राहणार नाही.

**(मा.पो.अ.यांचे मान्यतेने )**

**( सुनिल हूड)**
प्र.पोलीस उपअधिक्षक मुख्यालय
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकरीता.

**प्रति,**

वर नमूद पोलीस अंमलदार
**मार्फत** :- पोलीस निरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ.
१)त्यांनी उपरोक्त पोलीस अंमलदार यांना आदेशाची प्रत अदा करुन त्यांना त्यांचे नेमणूकीचे ठिकाणी रवाना

# भाग - ०२

# रजा / बिनपगारी रजा

PYAT-12014(13)/8/2025-EST-YTL-SP

1/36731/2

पोलीस अधीक्षक, कार्यालय, यवतमाळ
एल.आय.सी.चौक. ता.व जि. यवतमाळ. पिन कोड-445001
Email - sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र.पोअय/आस्था/कक्ष-९(२)/ )/बा सं रजा / /२०२५, यवतमाळ दिनांक :- 28 APR 2025

**कार्यालयीन आदेश**

शासन वित्त विभाग शासन निर्णय.क्रमांकःसकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६ दिनांक २३.०७.२०१८ चे शासननिर्णयानुसार खालील नमुद महिला पोलीस अमंलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांच्या मुलगा/मुलीच्या संगोपणाकरीता विशेष बालसंगोपन रजा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | म.पो. कर्म नाव व पदनाम | पो.स्टे. नेमणुक | प्रसुती दिनांक | बाल संगोपन रजा कितव्या अपत्याकरिता | देय रजा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मपोशि/621 प्रेरणा बबन काबळे | पोमु | दि. 12/10/2024 | पहिले | 60 दिवस |
| 2 | मपोशि/1557 निता वासुदेवराव फंड | पोमु | दि. 07/09/2024 | पहिले | 60 दिवस |

सदर महिला पोलीस अमंलदार यांना प्रसुती रजेला जोडून किंवा बालसंगोपन रजेवर सोडलेल्या दिनाकापासुन ६० दिवस मंजुर करण्यात येत आहे.

Signed by
Sunil Pandurangpant Hood
Date: 28-04-2025 13:22:

अटी व शर्ती

1) मुलाचे वय 18 वर्ष होईपर्यंत रजा लागु राहील.
2) एका वर्षामध्ये कमाल दोन महिण्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा लागु राहील.
3) पहील्या 02 जेष्ठतम हयात मुलाकरीता सदर रजा लागु राहील.
4) उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपण रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल
5) सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरणार नाही

मा.पो.अ.यांचे मान्यतेने.

प्र. पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ

अटी व शर्ती
Date: 28-04-2025 13:22:

प्रति,
राखीव पालीस निरीक्षक पो.मु
सदर रजेबाबत नमुद महिला पोलीस अमंलदार यांना वाढीव बालसंगोपण रजेबाबत समज दयावी. तसेच रजेवर सोडल्याचा अहवाल उलट टपाली या कार्यालयात सादर करावा.

प्रत माहितीस व कार्यवाहीस,
वेतन लिपीक-१ (कक्ष-१८)/डिपीजी लिपीक (कक्ष-१४) पो.अ. कार्या यवतमाळ.

PYAT-12014(13)/6/2025-EST-YTL-SP

1/36730/202

पोलीस अधीक्षक, कार्यालय, यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता.व जि. यवतमाळ, पिन कोड-445001
Email - sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र.पोअय/आस्था/कक्ष-९(२)/अर्जीत रजा/ 4514 /२०२५, यवतमाळ दिनांक :- 28 APR 2025

## कार्यालयीन आदेश

खालील नमुद पोलीस अमंलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे यांना त्यांचे विनंती नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम ५० अन्वये सन **२०२५** या वर्षाकरीता अर्जीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्रं | **पो.कर्म- नाव व पदनाम** | **नेमणुक** | **मंजुर रजा** | **रजेचे कारण** |
|---|---|---|---|---|
| ०१ | पोहवा /945 रविंद्र विजय पाटील | मो.प.वि यवतमाळ | 15 | धार्मीक कामा करिता |
| ०२ | सफो/655 प्रमोद केदारराव जिद्देवार | मारेगाव | 15 | मुलाचे लग्नाकरीता |

तसेच नमुद पोलीस अमंलदार यांना रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याच्या अनुपालन अहवाल या कार्यालयात संबंधीत लिपीक यांचेकडे सादर करावा.

**(मा. पोलीस अधिक्षक यांचे मान्यतेने)**

Signed by
Sunil Pandurangpant Hood
Date: 28-04-2025 13:18:56

**प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्या)**
**पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ**

**प्रति,**

मो.प.विभाग यवतमाळ पो स्टे.मारेगाव , यांना आवश्यक त्या कार्यवाहीस.

**प्रत माहितीस व कार्यवाहीस,:-** डि पी जी लिपीक , योग्य कार्यवाहीस

क्रमांक:पोअय/कक्ष -९ (१)/अ.रजा./ 4601 / २०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 29 APR 2025

**आ दे श**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांची रजा,म.ना.सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये सन **२०२५** या वर्षाकरिता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रामणे अर्जीत रजा मंजूर करण्यांत येत आहे.

| अ. क्र | पदनाम ब.न. | नेमणूक | मंजुर रजा दिवस | कारण |
|---|---|---|---|---|
| १ | GPSI/सपोउपनि/२२७ राजु उत्तम पवार | पो.मु.यवतमाळ | १५दिवस | मुलाचे लग्नाकरिता |
| २ | सपोउपनि/४३३ राजेश सदाशिव गवळी | पो.मु.यवतमाळ | १५ दिवस | धार्मिक कामाकरिता |

नमुद पोलीस अंमलदार यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहुन तसेच कामाची निकट पाहुन आळीपाळीने रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याची तारीख न चूकता या कार्यालयास कळवावी.

(मा.पो.अ.यांचे आदेशाने)

( सुनिल हुड)
**प्र. पोलीस उपअधिक्षक मुख्या.यवतमाळ**

**प्रति,** **प्रभारी अधिकारी :-** /रा.पो.नि.पो.मु.यवतमाळ /
**प्रत :-** कक्ष- १४ डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव.

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)/सिक हजर/ 4587 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 29 APR 2025

## आदेश

पोहवा/1534 संजय मोतीराम मोहतुरे, नेमणुक-पोलीस नियंत्रण कक्ष,यवतमाळ हे दि.04/11/2025 ते दि.29/04/2025 पावेतो एकुण 177 दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत सिक रजेवर होते. ते दि.29/04/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात येत आहे.
(त्यांचे रजा कालावधीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.)

( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये...)

( सुशिला पवार )
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,यवतमाळ करीता

प्रति,
प्रभारी अधिकारी पोलीस नियत्रंण कक्ष,यवतमाळ
*2/- नमुद पोलीस अंमलदार आपले विभागात हजर झाले नंत्तर अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.*
~~प्रत:- कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव~~
प्रत:- पोहवा/1534 संजय मोतीराम मोहतुरे, नेमणुक-पोलीस नियंत्रण कक्ष,यवतमाळ.

क्रमांक:पोअय/कक्ष-९(२)/सिक कालावधी/4589/२०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 29 APR 2025

## आदेश

चामपोशि/१०९९ गौरी प्रदिप राळेकर, नेमणुक-पो.स्टे.यवतमाळ ग्रामिण,हया दि.२१/१०/२०२४ ते २४/०४/२०२५ पावेतो एकुण १८६ दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.२४/०४/२०२५ रोजी मा. पो.अ यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात आले आहे.

त्यांचा सिक रजा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा)नियम-१९८१, नियम (६१) परीवर्तीत रजा व नियम (६३)अन्वये,असाधारण रजा (बिनपगारी) खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो अं यांचे नाव व पदनाम | एकुण दिवस | मंजुर रजेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | चामपोशि/१०९९ गौरी प्रदिप राळेकर, नेमणुक-पो.स्टे.यवतमाळ ग्रामिण | १८६ दिवस | दि.२१/१०/२०२४ ते दि.१९/११/२०२४ पर्यंत ३० दिवस परीवर्तीत रजा |
| | | | दि.२०/११/२०२४ ते दि.२४/०४/२०२५ पर्यंत १५६ दिवस असाधारण रजा (बिनपगारी) मंजूर करण्यात येत आहे. |

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

चामपोशि/१०९९ गौरी प्रदिप राळेकर, नेमणुक-पो.स्टे.यवतमाळ ग्रामिण.
मार्फत :- पोलीस निरीक्षक,पो.स्टे.यवतमाळ ग्रामिण.
प्रत :-कक्ष-१८ वेतन लिपिक/कक्ष-१४ डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव

क्रमांक:पोअय/कक्ष-९(२)/सिक कालावधी/ 4588 /२०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 29 APR 2025

## आदेश

पोशि/१८४५ शुभम नरसिंगराव जगताप, नेमणुक-पोलीस मुख्यालय,यवतमाळ हे दि.२६/१२/२०२४ ते २४/०४/२०२५ पावेतो एकुण १२० दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्तव रजेवर होते. ते दि.२४/०४/२०२५ रोजी मा. पो.अ यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करण्यात आले आहे.

त्यांचा सिक रजा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा)नियम-१९८१, नियम (६१) परीवर्तीत रजा व नियम (६३)अन्वये,असाधारण रजा (बिनपगारी) खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो अं यांचे नाव व पदनाम | एकुण दिवस | मंजुर रजेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पोशि/१८४५ शुभम नरसिंगराव जगताप,नेमणुक-पोलीस मुख्यालय,यवतमाळ | १२० दिवस | दि.२६/१२/२०२४ ते दि.२४/०१/२०२५ पर्यंत ३० दिवस परीवर्तीत रजा |
| | | | दि.२५/०१/२०२५ ते दि.२४/०४/२०२५ पर्यंत ९० दिवस असाधारण रजा (बिनपगारी) मंजूर करण्यात येत आहे. |

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,यवतमाळ.
प्रत :-कक्ष-१८ वेतन लिपिक/कक्ष-१४ डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव
प्रत:- पोशि/१८४५ शुभम नरसिंगराव जगताप, नेमणुक-पोलीस मुख्यालय,यवतमाळ

क्रमांक:पोअय/कक्ष-११/अर्जित रजा/आदेश / 4633 /२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 02 MAY 2025

## -: आदेश :-

खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आल्याप्रमाणे म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये **अर्जित रजा** मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिपीकांचे नाव व पदनाम नेमणुक शाखा | मंजुर करण्यात आलेला रजेचा कालावधी | रजा कारण | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | क.श्रे.लि.साधना जिवणे, प्रवंधक शाखा | दि.१६/०५/२०२५ ते दि.२२/०५/२०२५ एकुण ०७ दिवस | मुलाचे लग्न असल्याने | क.श्रे.लि. अताउल्ला खान, प्रवंधक शाखा |

**(मा. पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये.)**

Signed by
Sushila Charan Pawar
Date: 29-04-2025 16:45:20
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.**

**प्रति,**

**उपरोक्त नमुद संबंधित मंत्रालयीन लिपीक**

**प्रत -** पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/ प्रमुख लिपीक प्रबंधक/ कक्ष १४ यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

4641

क्रमांक:पोअय/कक्ष-११/ अतिरीक्त कार्यभार/का.शिपाई-गेडाम/२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- स्वाक्षरीत नमुद प्रमाणे 02 MAY 2025

## -: आदेश :-

कार्यालयीन शिपाई कांचन रामदास गेडाम पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ यांना डॉक्टरांनी स्टोन वाढल्याने ऑपरेशन करण्याचा सल्ला दिल्याने त्या दि.७/४/२०२५ रोजी पासुन वैद्यकीय कारणास्तव रजेवर असुन त्या कर्तव्यावर हजर होईपर्यंत त्यांच्या कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार कार्यालयीन शिपाई अतुल चव्हाण यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये.)**

Signed by
Sushila Charan Pawar
Date: 02-05-2025 11:17:27
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.**

प्रति,
१. कार्यालयीन शिपाई कांचन रामदास गेडाम पो.अ.कार्यालय यवतमाळ
२. कार्यालयीन शिपाई अतुल चव्हाण पो.अ.कार्यालय यवतमाळ.

प्रत:- पो.उप.अधीक्षक (मुख्या)यवतमाळ / कार्यालय अधीक्षक/ कक्ष -१४ यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

PYAT-11022(15)/18/2025-CB-YTL-SP I/37012/202

क्रमांक:पोअय/कक्ष-११/बदली रजा/ प्रमुख लिपीक जांभोरे/ 4634 /२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 02 MAY 2025

## -: आदेश :-

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्र. पोअय/वाचक/विपोमनि निरीक्षण/१०१३/२०२५ दि.२८/३/२०२५
२) प्रमुख लिपीक सुभाष जांभोरे यांचा विनंती अर्ज दि.२८/०४/२०२५

**विषय :-** बदली रजा मंजुरीबाबत.

---ooo---

प्रमुख लिपीक सुभाष जांभोरे, पत्रव्यवहार शाखा, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांनी दि.०५/०४/२०२५ या शासकीय सुटीचे दिवशी कार्यालयामध्ये उपस्थित राहिल्याने दि.०२/०५/२०२५ या ०१ दिवसाची बदली रजा मंजुर होणेकरीता केलेल्या विनंतीनुसार त्यांची दि.०२/०५/२०२५ रोजीची ०१ दिवसाची बदली रजा मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे. तसेच सदर रजा कालावधीमध्ये त्यांच्या कार्यासनाचा अतिरीक्त कार्यभार प्रमुख लिपीक ताराचंद धारगावे, आस्थापना शाखा, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)**

Signed by
Sushila Charan Pawar
Date: 29-04-2025 16:43:51
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधीक्षक, कार्यालय यवतमाळ.**

**प्रति,**

१) प्रमुख लिपीक सुभाष जांभोरे, नेमणुक पत्रव्यवहार शाखा, पो.अ.कार्यालय यवतमाळ
२) प्रमुख लिपीक ताराचंद धारगावे, नेमणुक आस्थापना शाखा, पो.अ.कार्यालय यवतमाळ

**प्रत -** पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक प्रबंधक शाखा /कक्ष १४ यांना माहितीस.

PYAT-11022(15)/9/2025-CB-YTL-SP

क्रमांक:पोअय/कक्ष-११/ रजा/ का.शिपाई गेडाम/ 4642 /२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- स्वाक्षरीत नमुद प्रमाणे 02 MAY 2025

**कार्यालयीन आदेश -**

**संदर्भ :-** १) कार्यालयीन शिपाई कांचन गेडाम यांचा विनंती अर्ज दि.१८/३/२०२५ व दि.२८/३/२०२५

---ooo---

कार्यालयीन शिपाई कांचन गेडाम, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांनी दि.१८/३/२०२५ रोजी 'त्यांचे दात दुखत असल्यामुळे त्यांना डॉक्टरांनी रुट कॅनल करण्यास सांगितल्याने त्या दि.१८/३/२०२५ पासुन वैद्यकीय कारणास्तव रजेवर असल्याबाबत' विनंती अर्ज कार्यालयास सादर केला असुन त्या दि.२८/०३/२०२५ रोजी कर्तव्यावर हजर झाल्या आहे. त्यांनी दि.१८/०३/२०२५ ते दि.२७/०३/२०२५ पर्यंत १० दिवस या कालावधीतील वैद्यकीय कागदपत्रे सादर केली परंतु त्यांचे रजा खाती परिवर्तीत रजा शिल्लक नसल्याने त्यांचा एकुण १० दिवस रुग्णनिवदेन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजा** मंजुर करण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये.)**

Signed by
Sushila Charan Pawar
Date: 02-05-2025 16:15:49
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.**

**प्रति,**
कार्यालयीन शिपाई कांचन गेडाम,
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**प्रत -** कक्ष १४ यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

# भाग - ०३

# वेतन / भत्ते / रोखिकरण

# भाग - ०४

# बक्षिस / मानधन

निरंक

# भाग - ०५

# शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक: पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आ/पोना-२१६३ जन्नावार/ 4604 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 APR 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोना-२१६३ जन्नावार/४१४३/२०२५, दिनांक ०८/०४/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**थोडक्यात कसुरी** :- दिनांक १४/१२/२०२१ पासुन ते अदयाप पर्यत गैरहजर राहुन कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

१) कसुरदार पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार, तुम्ही पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस असुन तुम्ही दिनांक १४/१२/२०२१ चे ०८.०० वा. पासुन वरिष्ठांना कोणतीही पुर्वसुचना न देता अनधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर आहात. तुमचे गैरहजेरीचे कालावधी दरम्यान सन २०२२ मध्ये झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती, नागपंचमी, मोहरम, गोकुळ अष्टमी पोळा, गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, हिवाळी अधिवेशन इत्यादी बंदोबस्त तसेच सन २०२३ मध्ये भरती बंदोबस्त, नवरात्र बंदोबस्त इत्यादी महत्वाचे बंदोबस्त मध्ये तुम्हाला कर्तव्यावर हजर होणेकरीता राखीव पोलीस निरीक्षक, यांनी स्पेशल पोलीस अंमलदार यांचे हस्ते दिनांक १०/०२/२०२२, १६/०८/२०२२, ११/०९/२०२२, १०/१२/२०२२, २८/०१/२०२३, ०३/१०/२०२३, २५/१२/२०२३ अशा एकुण ०७ नोटीस तुम्हाला देण्यात आल्या व त्या तुम्ही स्विकारल्या सुध्दा परंतु तुम्ही एकाही नोटीसचे उत्तर अथवा खुलासा सादर केला नाही. तसेच तुमचे गैरहजेरीबाबत कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. यावरुन तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाला जुमानत नसल्याचे दिसुन येत आहे.

२) कसुरदार पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही कर्तव्यावर हजर न झाल्याने राखीव पोलीस निरीक्षक यांनी तुमचा कसुरी अहवाल सादर या कार्यालयास सादर केंला. त्यानुसार या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-९/पो.अमंलदार गैरहजर वेतन बद/६११२/२०२२, दिनांक १०/०६/२०२२ अन्वये वेतन बंद करण्यात आले. परंतु त्याचाही तुमचे वर्तणुकीवर कोणताही परिणाम झालेला नाही.

३) कसुरदार पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता अनधिकृतपणे गैरहजर असुन तुम्हाला कर्तव्यावर हजर होणेकरीता आम्ही या कार्यालयाचे नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२(१)/पोना/२१६३ जन्नावार/१४४३/२०२३, दिनांक २१/०२/२०२३ अन्वये आदेशीत केले असतांना सुध्दा तुम्ही कर्तव्यावर हजर झाले नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. सदर बाब वरिष्ठांचे आदेशाची अवहेलना करणारी आहे.

४) कसुरदार पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही दिनांक १४/१२/२०२१ रोजी पासुन कर्तव्य टाळण्याचे उददेशाने हेतुपुरस्पर जाणीवपुर्वक अनधिकृतपणे गैरहजर आहात. तुम्ही तुमचे कर्तव्याप्रती निष्ठा, प्रामाणीकपणा न बाळगता सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०२४ या अतिमहत्वाचे बंदोबस्ताचे वेळी कर्तव्य टाळण्याचे उददेशाने जाणीवपुर्वक गैरहजर असुन तुमची हि कृती अत्यंत निष्काळजीपणाची व बेजबाबदापणाची आहे. तुमची पोलीस विभागामध्ये दिर्घकाळ सेवा झाली असतांना सुध्दा व कोणतेही वैदयकीय कारण नसतांना तुम्ही अशाप्रकारे कर्तव्यावर गैरहजर राहीलात ही अत्यंत गंभीर बाब

गैरहजर असल्याचे दिनांक ०८/०३/२०२५ चे अतिम जबाबामध्ये कबुल केले आहे. तसेच तुमच्या कर्तव्याचा अतिरीक्त भार इतर पोलीस अंमलदार यांना सोसावा लागला आहे. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे. तुम्ही तुमच्या कर्तव्यामध्ये नितांत सचोटी व कर्तव्यपरायनता न ठेवता शासकीय कर्मचा-याला अशोभनिय असे अत्यंत बेशिस्त, बेपर्वा व बेजबाबदारपणाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२(१)/प्राचौ/पोना-२१६३ जन्नावार/४२९०/२०२४, दिनांक २२/०३/२०२४ अन्वये प्रभारी अधिकारी पो.स्टे. दिग्रस यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/पोना-२१६३ जन्नावार/२८४/२०२५, दिनांक ०६/०१/२०२५ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली असुन उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा यांनी दिनांक १४/०३/२०२५ रोजी विभागीय चौकशी पुर्ण करुन समारोप अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, बेशिस्त व बेजबाबदारपणाचे तसेच तुम्ही कर्तव्यात अत्यंत गंभिर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोना-२१६३ जन्नावार/४१४३/२०२५, दिनांक ०८/०४/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismiss From service) ही शिक्षा का देण्यात येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला दिनांक १५/०४/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व तुम्ही दिनांक १४/०४/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुम्ही दिनांक १४/१२/२०२१ पासुन ते निलंबन दिनांक १७/११/२०२४ पावेतो एकुण ०३ वर्ष ०४ महिने, १५ दिवस असे दिर्घकालावधी पासुन गैरहजर असुन सदर गैरहजेरीबाबत तुम्ही कोणतेही वैदयकीय कागदपत्र या कार्यालयास सादर केलेले नाही व उपलब्ध नसल्याबाबत नमुद केले आहे. तसेच विभागीय चौकशीमध्ये तुम्ही स्वत: अनधिकृतपणे गैरहजर राहील्याबाबत नमुद केले आहे. यावरुन तुम्हाला तुमचे विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे मान्य असल्याने व विभागीय चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे पुर्णत: व निर्वीवादपणे सिध्द होत असल्याने प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**कसुरदार पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismissal From service) ही शिक्षा देण्यात येत आहे.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोना/२१६३ लक्ष्मीकांत जन्नावार,**
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

क्र.:पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./पोना 1167 राठोड / 4595 /25
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 APR 2025

**अंतिम आदेश**

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/कादानो/पोहवा ११६७ राठोड/१४२७/२०२५, दि.३१/०१/२०२५

**कसुरदाराचे नाव :- पोहवा/११६७ श्रीकांत नामदेव राठोड नेम. पो. स्टे. खंडाळा**

---ooo---

**पोहवा/११६७ श्रीकांत नामदेव राठोड नेम. पो. स्टे. खंडाळा** तुम्हाला पोलीस स्टेशन, खंडाळा येथील समन्स वॉरंट बजावण्याचे काम देण्यात आले होते. मागील विधानसभा निवडणुक काळात त्यांनी NBW वॉरंटची चांगल्या प्रमाणात तामील केल्याने पोलीस स्टेशन अधिकारी यांनी तुम्हाला बक्षीस अहवाल सुध्दा पाठविला आहे. दिनांक ०७/१२/२०२४ रोजी तुम्हाला भगंदरचा त्रास असल्याने वैद्यकिय अधिकारी उपजिल्हा रुग्णालय, पुसद यांनी बेडरेस्ट दिल्याने ठाणेदार यांनी तुम्हाला उपचाराकरिता सिक रजा दिली. सहायक पोलीस निरीक्षक देविदास आत्माराम पाटील हे पोलीस स्टेशन खंडाळा येथे ठाणेदार पदावर कार्यरत असून पोहवा/११६७ श्रीकांत नामदेव राठोड तुम्ही मागील तीन महिन्यापासून पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहे. दिनांक ३०/१२/२०२४ रोजी ठाणेदार यांनी सकाळ गणणा घेतली असता त्यात सिक गैरहजर व इतर अंमलदार यांचा आढावा घेत असतांना त्यात सिक मध्ये पोहवा/४९९ मुरलीधर वंजारे व पोहवा /११६७ श्रीकांत राठोड यांचे किती दिवस झाले बाबत हजेरी वर डयुटी मदतगार यांना विचारपूस केली. तेव्हा त्यांनी मुरलीधर वंजारे यांचे सिक बेडरेस्ट सर्टिफिकेट प्राप्त झाले व श्रीकांत राठोड यांचे देखील ५ दिवस वाढविल्याचे सांगितले. तेव्हा ठाणेदार यांचा मोबाईल क्र. ८८८८८३०७३३ पोहवा/११६७ राठोड यांचा मोबाईल नंबर ९३७०९९९६५६ वर फोन लावून सद्यस्थिती विचारपूस केली असता तुम्ही सांगितले की मला ५ दिवस बेडरेस्ट दिली असल्याने मी घरीच आहे. तेव्हा त्यांना विचारले की, ऑपरेशन केले आहे का? तेव्हा तुम्ही सांगितले की, शुगर मुळे ऑपरेशन केले नाही. नंतर हजर होतो. तेव्हा ठाणेदार यांनी सांगितले की तुम्ही वेळोवेळी कागदपत्रे व्हॉट्सअपवर टाकत जा. तसे वरिष्ठांना सांगता येते. तेव्हा तुम्ही मला व्हॉटसअपवर कागदपत्रे टाकली. त्यांना ठाणेदार यांनी सर्टीफिकेट व इतर उपचाराची कागदपत्रे पाठवा असे सांगितले. तेव्हा तुम्ही ती २५/१२/२०२४ ची कागदपत्रे पाठविली. तेव्हा त्यांनी सांगितले की, तुम्ही अगोदर टाकून द्यायची. त्यांनी मला व्हाट्सअपवर मॅसेज केला की, तुम्ही माझा मानसिक छळ करित आहात, तेव्हा ठाणेदार यांनी कागदपत्रे मागितले तर मानसिक छळ का तुम्हीच अगोदर टाकले असते तर बिघडले असते का? असा मॅसेज केला. ठाणेदार पोलीस स्टेशनमधील कॅबीन मध्ये कायदेशिर कामे असतांना तसेच त्यांना व्हीजीटर देखील भेटायला येत होती. त्यांना देखिल टाईम देवून टपाल बघून संबंधीत अंमलदाराचे नावाने सही अग्रेषित करीत असतांना तुम्ही स्वतः पोलीस स्टेशनला हजर आले. ठाणेदार यांना व्हीजीटर समोर वाद घालुन अश्लील व शिवराळ भाषेत वाद करु लागले. तेव्हा ठाणेदार व हजेरी मदतगार निरंजन यांने त्यांना आवरुन घेतले. ते तुम्हाला त्यांचे CCTNS रुम मध्ये घेवून जात असतांना तुम्हाला लोक त्यांना समजावीत होते. ठाणेदार तुम्हाला सांगत होते की, तुम्ही कागदपत्रे पाठविलेअसते तर मी कशाला तुम्हाला फोन केला असता. तुम्ही सिक रजेवर असतांना फक्त ठाणेदार यांचेसोबत वाद घालण्याकरिता पोलीस स्टेशनला आले होते. त्यानंतर तुम्ही निघून गेले.

पोलीस स्टेशन खंडाळा हद्दीत एकुण ४८ गावे असून सर्व ग्रामीण भाग पसरलेला आहे. व पोलीस स्टेशनला अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता आहे. पोलीस स्टेशन कर्मचारी सिक रजेवर असल्याने हजर असलेले कर्मचारी यांचेवर अतिरिक्त भार येत असतो. सदर कर्मचारी **पोहवा/११६७ श्रीकांत नामदेव राठोड नेम. पो. स्टे. खंडाळा** तुम्ही सिक रजेवर असतांना यापुर्वी तुम्ही बेडरेस्ट घेवून कधीच हजेरीवर किंवा पोलीस स्टेशनला हजर राहीले नाही. व कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर केले नाही. यापुर्वी ठाणेदार यांनी तुम्हाला तोंडी स्वरुपात सूचना दिली असता तुम्ही कोणत्याही प्रकारचे कागदपत्र पोलीस स्टेशनला आणून दिली नाही. ठाणेदार यांनी फक्त उपचाराचे कागदपत्र मागितली . म्हणुन तुम्ही पोलीस स्टेशनमध्ये येवून त्यांचेशी अश्लिल व

शिवराळ भाषेत वाद केला आहे. सदरची घटना ठाणेदार यांनी सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद यांना सांगितली असता त्यांनी सदर घटनेबाबत फिर्याद देण्यास सांगितल्याने ठाणेदार यांनी स्वत: फिर्याद देवून सदर कर्मचारी यांचेवर कलम २२१,३५२ BNS प्रमाणे NC नोंद केली आहे. सदर कर्मचारी यांनी बेशिस्त वर्तन करुन सदर बाब पोलीस विभागाला अशोभनीय असून खात्याची प्रतिमा जनमानसात मलीन करण्याचा प्रयत्न केला आहे.

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात गैरहजर राहुन गैरवर्तन केले आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/कादानो/पोहवा ११६७ राठोड/१४२७/२०२५,दि.३१/०१/२०२५ नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?"** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस स्विकारली असून तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष १२(१)/ आज्ञांकित कक्ष/पो.अधि.अंमलदार/४१९२/२०२५, दि.०९/०४/२०२५ रोजी पत्राव्दारे दि. ११/०४/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता यावे म्हणुन तुम्हाला आमचे समक्ष बोलावण्यात आले. तुमही आज्ञांकित कक्षात गैरहजर राहिले. तुमच्या गैरहजेरीबाबत प्रभारी अधिकारी यांना फोनव्दारे विचारणा करण्यात आली. तुम्हाला याबाबत माहिती देवूनही तुम्ही आज्ञांकित कक्षात गैरहजर राहिले. त्यामुळे तुम्ही सादर केलेले लेखी स्पष्टीकरण असमाधानकारक दिसून आले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोहवा/११६७ श्रीकांत नामदेव राठोड नेम. पो. स्टे. खंडाळा** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(५) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता रोखणे (अपरिणामकारक) "** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा सोडुन गणण्यात येईल.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**पोहवा/११६७ श्रीकांत नामदेव राठोड नेम. पो. स्टे. खंडाळा**

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक आस्थापना, कक्ष ९ (३)/कक्ष १४/कक्ष-१८/नोंदणी लिपीक, पो.अ.यवतमाळ/प्रभारी अधिकारी, पो.स्टे. खंडाळा यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना लिपीक कक्ष ९(३) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र.पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./मसपोउपनि-56 कुटे / 4594 /25
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 APR 2025

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष १२-१/कादानो/सफौ-५६ कुटे/१७३५/२०२५, दि.०५/०२/२०२५

**कसुरदाराचे नाव :-.मसपोउपनि/५६ स्वाती दादाराव कुटे नेमणूक पोलीस मुख्यालय, यवतमाळ**

---ooo---

तुम्ही स.फौ. स्वाती दादाराव कुटे नेमणूक पोलीस मुख्यालय, यवतमाळ तुम्ही सोशल मिडीया माध्यमातून पोलीस दलाची प्रतीमा मलीन होईल या उद्देशाने पोलीस विरोधी वार्ताकण वणी शहरातील वेगवेगळया Whatsapp ग्रुपवर वारंवार प्रसारित करत आहेत. तुम्ही स्वत: पोलीस दलाचा भाग असताना सुध्दा पोलीस दलाची बदनामी होईल असे वार्ताकन पोर्टवरील बातम्या, प्रसारित करीत आहेत. तुमच्या या वर्तवणुकीमुळे जनमानसात पोलीस दलाबद्दल नकारात्मक भावना निर्माण होत आहे. अशा प्रकारची नोंद पोलीस स्टेशन, वणी येथे १४/१५ दिनांक २२/०१/२०२५ वेळ ११/५९ वा. अन्वये सपोनि सिता वाघमारे वाहतूक उपशाखा वणी यांनी केली आहे. तसेच आम्हाला Whatsapp व्दारे screenshot पाठवून फोन व्दारे माहिती दिली आहे. सदर Whatsapp screenshot अवलोकनार्थ सहपत्रांसह सादर केले आहे. तुमची ही कृती अतिशय गंभिर असून पोलीस विभागाविषयी तुमची सन्मानाची भावना दिसून येत नाही.

उपरोक्त कसुरी प्रकरणी तुम्ही केलेली कसुरी ही अत्यंत गंभिर असून सदर कुसरीची नोंद पोलीस स्टेशन, वणी येथे १४/१५ दिनांक २२/०१/२०२५ वेळ ११/५९ वा. अन्वये सपोनि/ सिता वाघमारे, वाहतूक उपशाखा, वणी यांनी केली आहे. सदर अहवालानुसार तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत आहे. स.फौ./५६ स्वाती दादाराव कुटे तुमची पोलीस विभागाप्रती बेपर्वा वृत्ती व कर्तव्याप्रती अप्रामाणिकता, तसेच पोलीस विभागातील कर्मचारी यांच्याविषयी कल्याणाची भावना दिसून येत नाही. तुमचे वर्तन अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे असल्याचे निदर्शनास येत आहे.

सदर अहवालानुसार तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन, तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व अत्यंत गंभिर स्वरुपाचे आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात बेजबाबदारपणा केला आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष १२-१/कादानो/सफौ-५६ कुटे/१७३५/२०२५, दि.०५/०२/२०२५ नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?"** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस स्विकारुन स्पष्टीकरण दि.१०/०२/२०२५ रोजी या कार्यालयास सादर केले आहे. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी दि.११/०४/२०२५ रोजी आमचे समक्ष बोलावण्यात आले तेव्हा तुम्ही चुकीने मॅसेज पाठविण्यात आले असल्याचे तुम्ही मान्य केले. कारणे दाखवा नोटीस संदर्भातील सादर केलेले स्पष्टीकरण व आज्ञांकित कक्षातील निवेदनाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन तुम्हास **'ताकीद'** देण्यात येत आहे.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

स.फौ./५६ स्वाती दादाराव कुटे नेमणूक पोलीस मुख्यालय, यवतमाळ

क्र: पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अ.आ/पोना/१३२० खांडेकर/ 4606 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 APR 2025

# अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोना-१३२० खांडेकर/३७२५/२०२५, दिनांक २६/०३/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- पोना/१३२० संजय खांडेकर, तत्का. नेमणुक पो.स्टे. मुकूटबन सध्या पो.मुख्या.यवतमाळ.

**थोडक्यात कसुरी** :- कर्तव्यावर असतांना भ्रष्ट आचरण करुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

१) कसुरदार पोना/१३२० संजय रामचंद्र खांडेकर, तुम्ही पोलीस स्टेशन मुकूटबन येथे कार्यरत असुन तुमच्याकडे दिनांक २२/०९/२०२२ व २३/०९/२०२२ ला गुडमार्निग डयुटी देण्यात आली असता, तक्रारदार श्री. महादेव गोविंदराव खंडाळे, वय ४० वर्ष, व्यवसाय बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स व ट्रान्सपोर्ट रा. सोमनाथपुर, वार्ड क्र. १३ सोमनेश्वर मंदीराजवळ राजुरा, ता. राजुरा, जिल्हा चंद्रपुर यांचेकडे टाटा कंपनीचे हायवा टीप्पर वाहन क्रमांक एम.एच. ३४ बी.जी. ६४८४ दहा चाकी वाहन व वाहन क्रमांक एम.एच. ३४ ए.व्ही. ००१९ बारा चाकी वाहन तुम्हाला अवैध रेती वाहतुक संबधाने मिळुन आले असतांना ट्रकबाबत वरिष्ठ अधिकारी यांना रितसर माहिती देवुन स्टे.डा. नोंदी घेवुन कायदेशिर कार्यवाही करणे अपेक्षीत असतांना तुम्ही तशी कोणतीही कायदेशिर कार्यवाही केली नाही.

२) कसुरदार पोना/१३२० संजय रामचंद्र खांडेकर, तुम्ही दिनांक २२/०९/२०२२, २३/०९/२०२२ चे दैनंदिन हजेरी बुक नोंद व नमुद तारखांना पोलीस स्टेशन सि.सि.टी.एन.एस.स्टेशन डायरीला कर्तव्यावर रवानाबाबत नोंदीवरुन तुम्ही मुकूटबन येथे हजर होते. तसेच तुमचा मोबईल नंबर ९५५२५७१३२० हा दिनांक १६/०३/२०२३ पर्यत ॲक्टीव्ह असुन त्यानंतर सदर मोबईल नंबर बंद असल्याचे दिसुन येत आहे यावरुन तुमची वर्तणुक ही आक्षेपार्ह व संशयास्पद असल्याचे निदर्शनास येत आहे.

३) कसुरदार पोना/१३२० संजय रामचंद्र खांडेकर, तत्का. नेमणुक पो.स्टे. मुकूटबन सध्या पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमच्या कर्तव्यातील कसुरीमुळे पोलीस दलाची प्रतिमा मलिन होण्यास तुम्ही कारणीभुत ठरले आहेत. अशाप्रकारे त्यांनी लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, भ्रष्टाचारी आचरण, व पोलीस नाईक पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

४) तसेच पोना/१३२० संजय रामचंद्र खांडेकर, तत्का. नेमणुक पो.स्टे. मुकूटबन सध्या पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमचे कर्तव्यातील उपरोक्त कसुरीचे अनुषंगाने तुमचे विरुध्द पो.स्टे. मुकूटबन येथे अप.क्र. ८४/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे दिनांक १७/०२/२०२३ रोजी ००-४९ वाजता गुन्हा दाखल आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/पोना-१३२० खांडेकर/३१२९/२०२३, दिनांक १३/०४/२०२३ अन्वये उपविभागीय पोलीस अधिकारी वणी यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/पोना-१३२० संजय खांडेकर/५१५३/२०२४, दिनांक ०८/०५/२०२४ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली असुन उपविभागीय पोलीस अधिकारी पांढरकवडा यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये तुम्हास संपूर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, पांढरकवडा यांनी दिनांक १४/०२/२०२५ रोजी

विभागीय चौकशी पुर्ण करुन समारोप अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, बेशिस्त व बेजबाबदारपणाचे तसेच तुम्ही कर्तव्यात अत्यंत गंभिर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोना-१३२० खांडेकर/३७२५/२०२५, दिनांक २६/०३/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखण्याची (परिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? तसेच दिनांक २७/०२/२०२३ ते ११/०६/२०२३ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा (As Such) का गणण्यात येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला दिनांक ०७/०४/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व तुम्ही दिनांक १८/०४/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तसेच सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेसंबधाने निर्णय घेणेकरीता तुम्हाला दिनांक २८/०४/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता तुम्ही दिनांक २८/०४/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये हजर झालात. विभागीय चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे सिध्द होत असल्याने तसेच घटनेच्या कालावधीपर्यत तुमचा मोबाईल कार्यरत होता परंतु सदर घटनेनंतर तुमचा मोबाईन क्रमांक हा बंद असुन यावरुन तुमचे वर्तणुक हे आक्षेपार्ह व संशयास्पद असल्याचे दिसुन येत आहे. परंतु तुम्हाला सुधारण्याची संधी म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अशंतः बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**कसुरदार पोना/१३२० संजय खांडेकर, तत्का. नेमणुक पो.स्टे. मुकूटबन सध्या पो.मुख्या.यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे (परिणामकारक)" शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल. तसेच दिनांक २७/०२/२०२३ ते ११/०६/२०२३ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोना/१३२० संजय खांडेकर,**
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :- उपविपोअ वणी/उपविपोअ पांढरकवडा/प्रभारी अधिकारी पो.स्टे. मुकूटबन/रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ/कक्ष-९/कक्ष-०९-०३/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१८)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-०९-०३** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक

क्रमांकः पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आ/चापोना-१२६१कुमरे/ 4607 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 APR 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/चापोना-१२६१ दिनेश कुमरे/४१४२/२०२५, दिनांक ०८/०४/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- चापोना/१२६१ दिनेश रंगराव कुमरे, तत्का. पो.स्टे. पांढरकवडा
सध्या पो.मुख्या. यवतमाळ.

**थोडक्यात कसुरी** :- दिनांक १९/०४/२०२३ पासुन अनधिकृतपणे गैरहजर राहुन कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

१) कसुरदार चापोना/१२६१ दिनेश रंगराव कुमरे, तुम्ही पो.स्टे.पांढरकवडा येथे चालक पदावर कार्यरत असुन तुम्ही दिनांक १९/०४/२०२३ पासुन प्रभारी अधिकारी यांना कोणतीही माहिती न देता स्वमर्जीने कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर आहात.सदर गैरहजेरीबाबत पो.स्टे.पांढरकवडा येथे साना क्रमांक ०२५/२०२३ दिनांक १९/०४/२०२४ चे १४.३७ वा.नोंद घेण्यात आली आहे. तसेच तुम्हाला दिनांक २३/०३/२०२४ रोजी पो.नि. पो.स्टे. पांढरकवडा यांचेकडुन मुंबई पोलीस अधिनियम १९५१ कलम १४५ प्रमाणे कर्तव्यावर हजर होणेसंबधाने नोटीस देण्यात आली असता, तुम्ही सदर नोटीस दिनांक २८/०३/२०२४ रोजी स्विकारुन सुध्दा तुम्ही तुमचे कर्तव्यावर हजर झाले नाही. यावरुन तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाची अवहेलना केली आहे.

२) सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १५/१०/२०२४ पासुन आचारसंहिता लागु करण्यात आली होती. व दिनांक २०/११/२०२४ रोजी राज्यामध्ये मतदान होवुन दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी झाली आहे. त्याअनुषंगाने सदर कालवधीमध्ये मतदान प्रकीया सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे दिनांक १५/१०/२०२४ चे पत्रान्वये घटक प्रमुखांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कोणत्याही मोठया रजा शक्यतो मंजुर करु नयेत, याबाबत निर्देश दिल्याने तुम्हाला हजर होणेबाबत प्रभारी अधिकारी यांनी सुचित करुन सुध्दा तुम्ही तुमचे कर्तव्याचे ठिकाणी हजर झाले नाही हि गंभीर बाब आहे.

३) कसुरदार चापोना/१२६१ दिनेश रंगराव कुमरे, तत्का. नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा तुम्हाला कर्तव्यावर हजर होणकरीता पोहवा/२१९५ उमेश कुमरे यांचे हस्ते नोटीस देण्यात आली असता, तुम्ही पांढरकवडा ते सखी गावाचे मधात रस्त्यावर मोटार सायकलने पांढरकवडा जातांनी भेटले तेव्हा तुम्हाला तेथेच नोटीस तामील करण्यात आली. तसेच दिनांक १३/११/२०२४ रोजी मा. पोलीस अधीक्षक यांची नोटीस तामील करणेचे वेळेस तुम्ही बिरसा मुंडा चौक पांढरकवडा येथे होते. दिनांक २२/१२/२०२४ ला पोशि/२५०३ जितेंद्र वाघमारे हे प्राथमिक चौकशी संबधाने नोटीस तामील करीता गेले असता, तुम्ही बाहेरगावी होते. व दिनांक २३/१२/२०२४ रोजी तुम्हा यवतमाळ येथे असल्याबाबत सांगीतले यावरुन तुमची प्रकृती चांगली असुन तुम्ही दैंनदिन कामकाज करीत असल्याचे निदर्शनास येते.

४) कसुरदार चापोना/१२६१ दिनेश रंगराव कुमरे, तत्का. नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा तुम्ही दिनांक १९/०४/२०२३ रोजी पासुन कर्तव्य टाळण्याचे उददेशाने हेतुपुरस्पर जाणीवपुर्वक अनधिकृतपणे गैरहजर असुन तुम्ही दिनांक ०४/०९/२०२३ रोजी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सांवगी मेघे जि. वर्धा येथे उपचार घेतला तत्पुर्वी कोणताही वैदयकीय उपचार घेण्यात आलेला नाही. तुम्ही तुमचे कर्तव्याप्रती निष्ठा, प्रामाणीकपणा न बाळगता सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ या अति महत्वाचे बंदोबस्ताचे वेळी कर्तव्य टाळण्याचे उददेशाने जाणीवपुर्वक

असतांना सुध्दा तुम्ही महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग १ मधील नियम क्र. ३५५ चे ९ (अ) प्रमाणे कार्यवाही करता कर्तव्यावर गैरहजर राहीलात ही अत्यंत गंभीर बाब आहे. तसेच तुमच्या कर्तव्याचा अतिरीक्त भार इतर पोलीस अंमलदार यांना सोसावा लागला आहे. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे. तुम्ही तुमच्या कर्तव्यामध्ये नितांत सचोटी व कर्तव्यपरायनता न ठेवता शासकीय कर्मचा-याला अशोभनिय असे अत्यंत बेशिस्त, बेपर्वा व बेजबाबदारपणाचे गैरवर्तन केले आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/चापोना-१२६१ दिनेश कुमरे/२३३२२/२०२४, दिनांक २०/१२/२०२४ अन्वये प्रभारी अधिकारी पो.स्टे. घाटंजी यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/चापोना-१२६१ दिनेश कुमरे/२८१/२०२५, दिनांक ०६/०१/२०२५ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली असुन उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांनी दिनांक १७/०३/२०२५ रोजी विभागीय चौकशी पुर्ण करुन समारोप अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, बेशिस्त व बेजबाबदारपणाचे तसेच तुम्ही कर्तव्यात अत्यंत गंभिर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/चापोना-१२६१ दिनेश कुमरे/४१४२/२०२५, दिनांक ०८/०४/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismiss From service) ही शिक्षा का देण्यात येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला दिनांक १३/०४/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व तुम्ही दिनांक १६/०४/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तसेच सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेसंबधाने निर्णय घेणेकरीता तुम्हाला दिनांक २८/०४/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता तुम्ही दिनांक २८/०४/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये हजर झालात. परंतु तुम्ही गैरहजेरीबाबत कोणतेही ठोस कारण सांगु शकले नाही. तसेच तुम्ही दिलेले वैदयकीय कागदपत्राचे अवलोकन केले असता, तुमचे गैरहजर कालावधीनुसार कागदपत्र नसल्याने दिसुन येत आहे. यावरुन तुम्ही वैदयकीय कारण पुढे करुन अनधिकृत कर्तव्यावर गैरहजर असल्याचे निदर्शनास येत आह तसेच विभागीय चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे पुर्णतः व निर्वीवादपणे सिध्द होत असल्याने प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**कसुरदार चापोना/१२६१ दिनेश रंगराव कुमरे, तत्का. पो.स्टे. पांढरकवडा सध्या पो.मुख्या. यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismissal From service) ही शिक्षा देण्यात येत आहे. तसेच दिनांक २०/१२/२०२४ ते आदेश निर्गमीत केल्याचे दिनांकापर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे <u>६०</u> दिवसाचे आंत अपील करु शकतात.

क्र: पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आ/विधानसभा गैरहजर/ 4637 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 2 MAY 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/कादानो/विधानसभा गैर./०९ अंमल/२८३८/२०२५, दिनांक ०५/०३/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- १) पोहवा/विनोद चिचकार, तत्का. नेमणुक बि.सं. विभाग यवतमाळ सध्या पो.मु.यवत.
२) पोहवा/२२५४ दिनेश नाकतोडे, तत्का. नेमणुक पो.स्टे यवतमाळ श. सध्या पो.स्टे. दारव्हा.
३) पोना/१७५५ हदयनाथ वानखडे, तत्का. नेमणुक पो.स्टे यवतमाळ श. सध्या पो.स्टे. पुसद श.
४) चापोशि/२६२७ संजय तारे, तत्का. नेमणुक पो.स्टे यवतमाळ श. सध्या पो.स्टे. दराटी.
५) पोना/१३१६ संतोष राठोड, तत्का. नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ सध्या पो.स्टे. दराटी.
६) पोशि/१३८१ गजानन रत्नपारखी तत्का. नेमणुक पो.स्टे. दारव्हा सध्या पो.मुख्या. यवतमाळ.
७) पोशि/७५२ परिमल चक्रे, नेमणुक जि.वि.शा. यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ.
८) पोहवा/१३०५ अशोक परचाकी, तत्का. नेमणुक पो.स्टे. राळेगाव सध्या पो.मुख्या. यवतमाळ.

**थोडक्यात कसुरी** :- विधानसभा निवडणुक या अतिमहत्वाचे बंदोबस्त मध्ये गैरहजर राहुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

कसुरदार उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी कार्यरत असतांना सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १५/१०/२०२४ पासुन आचार संहिता लागु करण्यात आली आहे. दिनांक २०/११/२०२४ रोजी राज्यामध्ये मतदान होणार असुन दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी होणार होती. त्याअनुषंगाने सदर कालवधीमध्ये मतदान प्रक्रीया सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे दिनांक १५/१०/२०२४ चे पत्रान्वये घटक प्रमुखांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कोणत्याही मोठया रजा शक्यतो मंजुर करु नयेत, याबाबत निर्देश देण्यात आले असतांना सुध्दा तुम्ही सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ या अतिमहत्वाचे बंदोबस्ताचे वेळी कर्तव्य टाळण्याचे उददेशाने जाणीवपुर्वक कर्तव्यावर गैरहजर असल्याचे आढळुन आलेले आहेत.

कसुरदार १) पोहवा/विनोद चिचकार हे दिनांक ०७/०९/२०२४ पासुन, २) पोहवा/२२४५ दिनेश नाकतोडे हे २१/०६/२०२४ पासुन, ३) पोना/१७५५ हदयनाथ वानखडे हे २२/०३/२०२४ पासुन, ४) चापोशि/२६२७ संजय तारे हे १२/०९/२०२३ पासुन ५) पोना/१३१६ संतोष राठोड हे २१/०७/२०२३ पासुन, ६) पोशि/१३८१ गजानन रत्नपारखी हे दिनांक २९/०४/२०२३ पासुन, ७) पोशि/७५२ परिमल चक्रे हे दिनांक २६/०६/२०२४ पासुन ८) पोहवा/१३०५ अशोक परचाकी हे दिनांक १०/११/२०२३ पासुन कर्तव्यावर गैरहजर असुन तुम्हाला सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने कर्तव्यावर हजर होणेबाबत तुम्हाला पोलीस स्टेशन व वरिष्ठ कार्यालयाकडुन वांरवार निर्देश व सुचना देण्यात येवुन सुध्दा तुम्ही तुमचे कर्तव्यावर हजर झाले नाही. यावरुन तुम्ही वरिष्ठांनी तुम्हाला दिलेल्या आदेशाला जुमानत नसल्याचे दिसुन येत आहे ही गंभीर बाब आहे.

कसुरदार उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार तुम्ही तुमचे कर्तव्याप्रती निष्ठा, प्रामाणीकपणा न बाळगता सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ या अतिमहत्वाचे बंदोबस्ताचे वेळी कर्तव्य टाळण्याचे उददेशाने जाणीवपुर्वक सिक / गैरहजर असुन तुमची हि कृती अत्यंत निष्काळजीपणाची व बेजबाबदापणाची आहे. तुमची पोलीस विभागामध्ये दिर्घकाळ सेवा झाली असतांना सुध्दा अशाप्रकारे कर्तव्यावर गैरहजर राहीलात ही अत्यंत गंभीर बाब आहे. यावरुन तुम्ही पोलीस नियमावली भाग १ चे नियम क्र. ४१६ (१) चा भंग केल्याचे निष्पन्न होत आहे. तसेच तुमचे कर्तव्याचा अतिरीक्त भार इतर पोलीस अंमलदार यांना सोसावा लागला आहे. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/संयुक्तीक प्रा.चौ/१० पो.अंमलदार/२२१९७/२०२४, दिनांक १३/१२/२०२४ अन्वये पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ यांना संयुक्तीक प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/विधानसभा गैर/०९ अमल/२८३८/२०२५, दिनांक ०४/०३/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व अ.क्र. ०६ व ०८ वर नमुद पोलीस अंमलदार यांनी दिनांक २४/०३/२०२५ व ११/०४/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. प्राथमिक चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे सिध्द होत असल्याने तसेच तुम्हाला पोलीस स्टेशन व वरिष्ठ कार्यालयाकडुन वांरवार निर्देश व सुचना दिल्या असतांना सुध्दा तुम्ही विधानसभा निवडणुक २०२४ या अतिमहत्वाचे बंदोबस्तामध्ये गैरहजर असुन यावरुन तुमचे वर्तणुक हे बेशिस्त व बेजबाबदारपणाचे असल्याचे दिसुन येत असल्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**१) कसुरदार पोहवा/विनोद चिचकार यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

**२) पोहवा/२२५४ दिनेश नाकतोडे, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल. तसेच दिनांक १७/११/२०२४ ते ०७/०२/२०२५ पर्यंतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

**३) पोना/१७५५ हदयनाथ वानखडे, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल. तसेच दिनांक १७/११/२०२४ ते ०५/०२/२०२५ पर्यंतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

४) चापोशि/२६२७ संजय तारे, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल. तसेच दिनांक १७/११/२०२४ ते ०४/०२/२०२५ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.

५) पोना/१३१६ संतोष राठोड, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल. तसेच दिनांक १७/११/२०२४ ते २३/०२/२०२५ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.

६) पोशि/१३८१ गजानन रत्नपारखी, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.

७) पोशि/७५२ परिमल चक्रे, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.

८) पोहवा/१३०५ अशोक परचाकी यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (अपरिणामकारक) शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

१) **पोहवा/विनोद चिचकार,** नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ.
२) **पोहवा/२२५४ दिनेश नाकतोडे,** नेमणुक पो.स्टे. दारव्हा.
३) **पोना/१७५५ हदयनाथ वानखडे,** नेमणुक पो.स्टे. पुसद शहर.
४) **चापोशि/२६२७ संजय तारे,** नेमणुक पो.स्टे. दराटी.
५) **पोना/१३१६ संतोष राठोड,** नेमणुक पो.स्टे. दराटी.
६) **पोशि/१३८१ गजानन रत्नपारखी** नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ.
७) **पोशि/७५२ परिमल चक्रे,** नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ.
८) **पोहवा/१३०५ अशोक परचाकी,** नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ.

पोलीस अधीक्षक, कार्यालय, यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता.व जि. यवतमाळ. पिन कोड-445001
Email - sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र.पोअय/आस्थापना/कक्ष-9/सेनि-पो.अंम.-एप्रिल-2025/4620/2025, यवतमाळ दिनांक :- DSC ई-स्वाक्षरीनुसार

**कार्यालयीन आदेश** 30 APR 2025

यवतमाळ जिल्हा पोलीस घटकामधील खालील नमूद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावासमोर नमूद जन्म दिनांकानुसार वयाची 58 वर्षे पुर्ण करीत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन ) नियम, 1982 मधील नियम 63 मधील तरतुद व महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे-1099/34/सेवा-4, दिनांक 02 फेब्रुवारी, 1999 मधील तरतुदीनुसार दिनांक 30/04/2025 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणार आहे. त्यांचे नाव **दिनांक 30/04/2025** रोजी मध्यान्हानंतर पासून या आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | पोलीस अंमलदाराचे सेवापटात नमूद संपुर्ण नांव | नेमणूक ठिकाण | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रेडपोउपनि | 565 | साहेबराव सवाईराम राठोड | जि.वा.शा,यवतमाळ | 13/04/1967 | 30/04/2025 |
| 2 | सपोउपनि | 1003 | देविदास नामदेवराव चंगोले | पो.मु.यवतमाळ | 01/05/1967 | 30/04/2025 |
| 3 | पोना | 1716 | रमेश गणपतराव डोंगरे | पो.मु.यवतमाळ | 06/04/1967 | 30/04/2025 |
| 4 | सपोउपनि | 1726 | शिवदास भगवानजी गाडेकर | पो.स्टे.नेर | 23/04/1967 | 30/04/2025 |

Signed by
Kumar Chintha
Date: 30-04-2025 12:03:14

पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

सर्व संबंधीतास

**मार्फत** :-राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,यवतमाळ/पोलीस निरीक्षक,जि.वा.शाखा यवतमाळ/ पोलीस निरीक्षक,पो.स्टे.नेर

2. यांनी वर नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक 30/04/2025 चे मध्यान्हानंतर पासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीवर सोडावे व तसा अनुपालन अहवाल न चुकता या कार्यालयास सादर करावा व सदर वरील सेवानिवृत्त पोलीस अंमलदार यांना किटपेटी सरंजाम, ओळखपत्र व इतर साहीत्य पोलीस मुख्यालय येथे जमा करण्यावावत सुचना द्याव्यात.

प्रत :-राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय, यवतमाळ.

प्रत,

कार्यालय अधीक्षक/प्रमुख लिपीक-आस्थापना शाखा/लेखा शाखा/पत्रव्यवहार शाखा/ विभागीय चौकशी शाखा/वेतन लिपीक कक्ष-18/पेन्शन लिपीक कक्ष-16/भविष्य निर्वाह निधी लिपीक/विभागीय चौकशी लिपीक /पोलीस कल्याण निधी लिपीक/सहा.आस्थापना लिपीक 9 (1)(2)(3)(4) व (5)/प्रवास भत्ता लिपीक/वस्त्रागार पो.मु.यवतमाळ/वैद्यकीय देयक लिपीक/ इमारत लिपीक/राजपत्र लिपीक कक्ष-14 यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

प्रत :- पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) यवतमाळ/पोलीस नियंत्रण कक्ष./प्रभारी शाखा प्रमुख, कल्याण शाखा,यवतमाळ

# भाग - ०६

# प्रशिक्षण व इतर

निरंक